ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 12 | AUGUST - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# अठराव्या शतकातील महान महिला शासक पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



डॉ.लखपती वा. गायकवाड
इतिहास विभाग, महिला कला महाविद्यालय, उमरेड,
जि. नागपूर.

**प्रस्तावना**

कर्तव्यदक्ष, दानशुर, कुशल प्रशासक आणि महाराष्ट्रच्या अस्मितेचा मानबिंदु पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होय. यांनी आपल्या राज्यकारभार कुशल केला नाही तर जनतेच्या जीवनात नविन चैतण्य निर्माण करण्यासाठी अनेक उपक्रम त्यांनी हाती घेतल्याचे दिसुन येते. त्यामधे प्रजेला सुखी व्हावे रोजगार निर्मान व्हावा आणि स्त्री—पुरुष समानतेचा आधार मिळावा. या दुरदृष्टीकोणातून त्यांनी अनेक सामाजिक आदी आर्थिक क्रांतीकारक उपक्रम घेवून राबविलेअहिल्या बाई होळकरांचा जन्म ३१ मे १६२५ रोजी महाराष्ट्रातील जामखेड तालुक्यातील चौडी या गावात झाला असुन भरतीय इतिहासात एक विशेष त्यांचे स्थान आहे. आपल्या मातृभूमीची भारतमातेची सेवा करण्याचा आपल निश्चय थोडाही कमी होवू दिला नाही. त्यामुळेच येणाऱ्या पिढ्यांना या महान व्यक्तिमत्वांकडून नेहमी प्रेरणा मिळत राहील यासाठी हा अनमोल वारसा जपला जात आहे. १८ व्या शतकातील पारंपारीक रुढी व संकल्पना ओलांडुन त्यांनी अफाट लोककल्याणकारी कार्य केली. महिलांच्या असंख्य पिठ्यांना कायम प्रेरण मिळाली आहे. पती खंडेराव यांचा मृत्यु झाल्याने अहिल्यादेवी होळकर सती जाण्यास निघाली पण तिचे सासरे मल्हाराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासुन रोखले होते. त्यांच्या सासऱ्याच्या मृत्युनंतर अहिल्यादेवी होळकरांचे साम्राज्य कोसन्यायालय सुरुवात झाली. अनेक राज्यकर्ते त्यांच्या साम्राज्याचा घास होण्यास टपुन बसले होते. युध्दाची तयारी करीत होते.शिवाय त्यांचे अंतर्गत विरोधक होतेच अशा भयंकर प्रतिकुल परिस्थितही अहिल्यादेवी होळकर यांनी आपली हिम्मत हारली नाहीअहिल्या देवी होळकरांची नितिमान आणि सुसंस्कृत राजकीय व्यवहाराची किर्ती सर्वत्र पसरली होती. अहिल्याबाई होळकर यांचे साधुपूर्ण कणरवर वर्चस्व सर्वदुर प्रस्थापित होत गेले महिलांवरिल अण्यायाबाबतीस जागरुक होत्या. त्या करिता अनेक कायदे निर्माण केलेत. त्यामध्ये पतीच्या निधनानंतर संपत्तीचा अधिकार विधवा स्त्रीलाच मिळावा. विधवेला दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार मिळावा. मुलीला वडिलांच्या संपत्तीमधील हिस्सा मागण्याचा अधिकार, हुंडा बंदीचा अधिकार, करुन प्रत्येक महिंलामध्ये धैर्य आणि विश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी केले सन्मानाने स्त्रियांनी आपले जीवन जगावे असे त्यांना वाटु लागलेअहिल्या देवी होळकर यांना त्यांच्या सासंऱ्यानी काही कोटी रुपये संपत्ती दिली पण ती त्यांनी समाजासाठी वापरण्याची प्रतिज्ञा घेवुन त्यांनी स्वत: साध्वीचे जीवन जगू लागल्या. राज्य सुसंस्कृत असण्यासाठी प्रजा जागृत शीलवान आणि कार्यक्षम असावी त्यासाठी अहिल्यादेवी होळकरांनी शेती, वृक्ष संपदा, वस्त्र विवणे चित्रकला, शिल्पकला यांना प्रोत्साहन दिले. भारतातील प्रसिध्द ठिकाणाची मंदिर जुण्या मंदिरांचा जीर्णोद्वार लांब मार्ग रस्ते, महिला वर्गास पाण्याच्या ठिकाणी सुरक्षित काम करण्यासाठी धाट हे त्यांच्याच काळात झाले असे म्हणता येईलअहिल्या देवी होळकर

ह्या स्वतः लढवय्या असुन त्यांनी सैनिकी शिक्षण घेतले होते. आपल्या सैण्याचे मनोधैर्य टिकविण्यासाठी सैण्यदलात नेहमी भेट देत असत. सैण्यावर त्यांचे बारिक लक्ष राहत असे. अहिल्यादेवी होळकरांच्या सैण्यामध्ये महिला तुकडी सुध्दा निर्माण करुन पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देवून महिलांना हक्काचे काम दिले. यामुळे समाजातील चालीरुढी कणस्वरपऐ मोडुन काढल्या. त्यांचे हेर विभाग म्हणजे एक प्रकारे त्याकाळातील आव्हाणच होते. काही प्रदेशाची माहीती त्यांना गुप्तहेरामार्फत दररोज मिळत होती त्यांच्यामध्ये राजकारणातील समय सुचकता दिसुन येत होती असे काही उदाहरणावरुन दिसुन येते. अहिल्यादेवी होळकर यांच्यामध्ये जीवनदृष्टी मुळत परिवर्तनशील व पुरोगामी विचारणीवर आधारलेली होती. त्यामुळे त्यांनी पारंपारिक अंधश्रध्देवर आधारलेल्या रुढी, परंपरा यांना धार्मिक व सामाजीक आधार दिलेला नाही. त्यांनी स्वतः पडदा पध्दती पाळली नाही व ती पाळलीच पाहिजे म्हणुन आपल्या साम्राज्यातील महिलांवर बंधन घातले नाही अहिल्या देवी होळकर यांनी आपल्या राज्याच्या सीमा व जनतेचे रक्षण करण्यासाठी अनेक किल्यांचे बांधकाम केले यामुळे त्यांच्या राज्यांचा बंदोबस्त योग्य झालेला होता. गोरगरिब जनतेला त्रास होऊ नये या गोष्टीकडे त्यांचे नेहमी लक्ष राहत असे. जनतेला योग्य न्यास मिळण्यासाठी अनेक ठिकाणी न्यायालयांची स्थापना करुन मोफत न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण केली. त्यावेळी आदिवासी जमात वाटसरुची लुटालुट करित होती त्यांना पकडुन मृत्युदंडाची शिक्षा देवू लागल्या काहींना अभय देवून व्यवसायामध्ये सवलती दिल्यापुण्यश लोक अहिल्यादेवी होळकर यांना भारतीय इतिहासात एक आदर्श मानले जाते. आज संपुर्ण भारतात त्यांचे पुतळे आणि स्मारके आहेत. त्यांचे पुतळे आणि स्मारक त्यांचा त्याग अफाट धैर्य व देशाविषयीची समर्पित वृती यांची आठवण करुण देतात. अहिल्यादेवी होळकरांचे विचार त्यांची तत्वे व कार्यप्रणाली आजही कशी लागु पडतात हे त्यांच्या जीवनचरित्रावरुन कळुन येते. देशभक्तीची भावना आणि त्यांनी ज्या स्वांतत्र्यासाठी लढा दिला त्यांचे रक्षण करण्याची सामाजिक वचनबध्दता त्यांच्या स्मारकांमधुन प्रज्वलीत होते. महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण, संरक्षण यांसारख्या आधुनिक संकल्पना त्यांनी सुमारे अडीचशे वर्षपुर्वी प्रत्यक्ष राबविल्या यावरुन आपल्याला त्या किती दुरदृष्टीच्या आणि कार्यक्षमतेच्या होत्या हे दिसुन येते. अशा लोकमाता अहील्यादेवी होळकर अठराव्या शतकातील महान महिला शासक होत्या असे म्हणावे लागत आहे यामध्ये काहीच संशय घेता येत नाही. आजच्या तरुणपिढीला यांच्या कार्याची माहीती व्हावी या करिता त्यांचे वारंवार स्मरण केले जात आहे.

### संदर्भ

१. जनकल्याणी अहिल्याबाई होळकर ले. अजित पाटील
२. लोकभाता अहिल्यादेवी होळकर ले. पुरुषोत्तम खेडकर
३. कर्तबगार राज्यकर्ती अहिल्याबाई होळ्ज्कर ले. नवनाथ शिंदे
४. हिंदु धर्मप्रवण पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ले. अशोकराव शिंदे—सरकार
५. अहिल्याबाई होळकर ले. श. रा. देवळे
६. दैनिक तरुण—भारत— दि. ३१ मे २०२५ आकांक्षा—पुरवणी